# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,औरंगाबाद

## दिनांक १७/४/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या औरंगाबाद मंडळाच्या १२६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. आ.श्री.कुंडलीकराव नागरे. | सभापती औरंगाबाद मंडळ. |
| २. | मा. श्री.के.बी.गवळी. | मुख्य अधिकारी तथा उपसभापती औरंगाबाद मंडळ. |
| ३. | मा. श्री.मकरंद सावे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ४. | मा. श्री.बबनराव देशमुख. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ५. | मा. श्री. ॲड जे.पी.पाटील. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ६. | मा. श्री.साहेबराव खरात. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ७. | मा. श्री.संजय वाघचौरे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ८. | मा. श्री. वामनराव राऊत. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ९. | मा. श्री.राजेश्वर चव्हाण. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| १०. | मा. श्री.विश्वासराव उपासे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ११. | मा. डॉ.डी .डी.शिंदे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| १२. | मा. श्री चाँदपाशा इनामदार. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| १३. | मा. श्रीमती शैलजा गायकवाड. | सदस्या औरंगाबाद मंडळ. |
| १४. | मा. श्री.शेख मुदस्सीर, सहायक नगररचनाकार, उपसंचालक नगररचना याचे प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी. |
| १५. | मा. श्री.सिंकदर अली, कार्यकारी अभियंता, मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी. |

### विषय क्रमांक . १ औरंगाबाद मंडळाच्या दिनांक ७/३/२००३ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

मंडळाच्या दिनांक ७/३/२००३ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताविषयी विस्तृत माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मंडळाने १२५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मान्य केला व खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७५३:-**

दिनांक ७/३/२००३ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकी चा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्रमांक २:- सहयोगनगर नांदेड येथील विविध योजनांसाठी आरक्षीत भूखंड एक रक्कमी खरेदी पध्दतीवर वाटप करण्याबाबत.

या बाब टिप्पणीविषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सहयोगनगर नांदेड येथील मंडळाच्या वसाहतीमध्ये विविध योजनांसाठी आरक्षीत भूखंड एक रक्कमी खरेदी पध्दतीवर वाटप करण्याकरिता मंडळाने दिनांक १५/१/२००३ रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यांतआल्या होत्या. तिन भूखंडापैकी फक्त ' दुकानासाठी आरक्षीत ' भूखंडांकरिता तिन निविदा प्राप्त झाल्या असल्याबाबतच मुख्य अधिकारी यांनी मंडळास सांगितले.

या विषयावर मंडळाने सविस्तर चर्चा केली व चर्चेअंती मंडळाने सदर विषय संस्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला.

विषय क्र.३:- आर- २८ सिडको, नविन औरंगाबाद येथील रहिवाशी सोसायटी भूखंडाच्या निविदेबाबत.

या बाब टिप्पणीविषयी मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यानी मंडळास माहिती दिली. या विषयावर चर्चा करताना मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, या भूखंडासाठी एकच निविदा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मंडळास मिळणार नसल्याने प्राप्तझालेली निविदा रद्य करुन अल्पमुदतीची नोटीस काढण्यात यावी असा निर्णय झाला त्यास अनुसरुन मंडळाने मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र :-७५४

आर-२८ सिडको, नविन औरंगाबाद येथील रहिवाशी सोसायटी भूखंडासाठी एकमेव प्राप्त झालेली निविदा रद्द करुन अल्पमुदतीची नोटीस देऊन फेरनिविदा मागविण्यांत याव्यात.स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही त्वरीत करावी.

विषय क्र ४:- राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत परळी वै. येथील घोषित झोपडपटटीतील कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या बाब टिप्पणीविषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली की, राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा कार्यक्रमा अन्तर्गत परळी नगरपरिषदेने शासनाच्या दिनांक ०१/१०/९९ च्या निर्णयानुसार घोषित झोपडपटटयामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठीचे अंदाजपत्रक रुपये ७०,०१,०६२/- प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेले आहे. शासनाच्या मानका प्रमाणे तपासले असता न.प. परळीनेसादर केलेल्या अंदाजपत्रकापैकी रुपये ६७,१४,०९९/-एवढी रक्कम प्रशासकीय मान्यतेस पात्र ठरते.परंतु प्राधिकरणाच्या
दिनांक ३/४/९३ च्या परिपत्रकान्वये स्पीलओअर निधीच्या दिडपटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करता येते.परळी नगरपरिषदचे हाती स्पीलओअर कामे लक्षात घेता रुपये ३७.५० लक्ष पर्यन्तच्या कामांना अटीच्या अधिन राहुन व आर्थिक तरतुदीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करता येऊ शकेल असे मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७५५

झोपडपटटी सुधार कार्यक्रमा अंतर्गत परळी वैजनाथ येथील सोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणे एकुण ७ झोपडपटटयांनामधील मुलभूत सुविधा पुरविण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकापैकी रु. ३७,८२,७९० एवढया रक्कमेस अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावा असाही मंडळाने ठराव घेतला .

सदर बैठक संस्थगित करुन दिनांक २१/४/२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्याचा निर्णय होऊन बैठक स्थगित करण्यात आली.

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,औरगाबाद

## दिनांक १७/४/२००३ रोजी मंडळाच्या १२६ वी संस्थगित झालेली बैठक दिनांक २१/४/२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता झालेले बैठकीचे कार्यवृत्तांत

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा.आ.श्री.कुंडलीकराव नागरे | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २. मा.श्री.के.बी.गवळी | मुख्य अधिकारी तथा उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३. मा.श्री.मकरंद सावे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ४. मा.श्री.बबनराव देशमुख | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ५. मा.श्री. ॲड जे.पी.पाटील | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ६. मा.श्री.साहेबराव खरात | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ७. मा.श्री.संजय वाघचौरे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ८. मा.श्री. वामनराव राऊत | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ९. मा.श्री.राजेश्वर चव्हाण | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १०. मा.श्री.विश्वासराव उपासे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ११. मा.डॉ.डी.डी.शिंदे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १२. मा.श्री चॉंदपाशा इनामदार | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १३. मा.श्रीमती शैलजा गायकवाड | सदस्या औरंगाबाद मंडळ |

दिनांक १७/४/२००३ रोजीची संस्थगित करण्यांत आलेली बैठक मंडळाच्या सभागृहात पटलरावरील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आल्याबाबत मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले.पटलावरील विषयावर चर्चा करते वेळी मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी शासकीय विश्रामगृह औरंगाबाद येथे मंडळाच्या विविध समस्यांवर मा. सभापती औरंगाबाद मंडळ,मंडळाचे सदस्य यांचे समवेत चर्चा करण्यासाठी पाचारण केल्यामुळे मा.सभापती यांच्या आदेशान्वये सदर बैठक रद्द करण्याचे ठरले.